प्रेसनोट

अ.क्र.	शिर्षक	तपाशिल/ काय नमुद करावे
१	घटक	ला.प्र.वि. यवतमाळ
२	तक्रारदार	पुरुष, ६० वर्ष, व्यवसाय – शेती
३	आरोपी	१)इलोसे विनोद शंकरराव सोळुंके, वय ३८ वर्ष पद–ऑपरेटर, कंत्राटी कर्मचारी, रा. टेंभी तालुका महागाव.२)आलोसे आनंद हरिश्चंद्र बोरेकर, वय ३८ वर्ष, पद– वनपाल, वर्ग ३, नेमणूक वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) कार्यलय, महागाव ह. मु. शासकीय निवासस्थान वन वसाहत, महागाव. मूळ रा. महावीर नगर दारव्हा रोड टीव्हीएस शोरूम च्या पाठीमागे यवतमाळ. ३)आलोसे जयवंत सदु ढगे, वय – ५५ वर्ष, पद– वनमजूर, वर्ग ४, नेमणूक वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) कार्यालय, महागाव रा. पिंपरी, ता. महागाव, जि. यवतमाळ
४	तक्रार	दि. २९/०९/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडिलोपार्जित घर पाडल्याने त्यातून निघालेले जुने सागवान लाकूड नवीन मध्ये रूपांतरीत करण्याकरिता उमरखेड येथे घेऊन जाणे असल्याने सदर घरगुती जुने सागवान उमरखेड येथे वाहतूक करण्याकरिता वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक वनविभाग, महागाव येथील कम्प्युटर ऑपरेटर श्री. विनोद सोळंके यांनी वाहतूक परवानगी पास करिता तुम्हाला ७०० रुपये शासकीय चलन भरावे लागेल, व त्या व्यतिरिक्त ४००० रुपये वेगळे द्यावे लागतील, पूर्ण पैसे दिले नाही तर तुमचे काम होणार नाही. असे म्हणून ४००० रु. लाचेची मागणी केली. अशी तक्रार प्राप्त झाली.
५	तक्रारीची पडताळणी	दि. २९.०९.२०२६ चे १३:३० ते २२:३० व ३०.०९.२०२६ चे १४:४८ ते १५:१३ वाजेच्या च्या दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय (प्रादेशिक) महागाव येथे येथे पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये इलोसे १. विनोद सोळंके, कम्प्युटर ऑपरेटर (कंत्राटी कर्मचारी), व आलोसे २. आनंद बोरेकर, वनपाल यांनी तक्रारदार यांचे घरगुती जुने सागवान उमरखेड येथे वाहतूक करण्याकरिता वाहतूक परवानगी पास करिता ७०० रुपये शासकीय चलन भरून त्या व्यतिरिक्त स्वत:साठी व इतरांसाठी ४००० रुपये लाच रकमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. तसेच आलोसे ३. जयवंता ढगे, वनमजूर यांनी लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले.
६	सापळा कार्यवाही	दि. ३०.०९.२०२६ चे १६:३३ वा ते १६:४९ वा सापळा कारवाई दरम्यान, ईलोसे १. विनोद सोळंके, कम्प्युटर ऑपरेटर यांनी ४०००/–रु. लाच रक्कम तक्रारदार यांचेकडून त्यांचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक कार्यालय महागाव येथील संगणक कक्ष, येथे पंचासमक्ष स्विकारल्याने त्यास सापळा पथकाने ताब्यात घेऊन, इलोसे यांनी त्यांचे टेबलवर ठेवलेले ४००० रु लाच रक्कम जप्त केलेली आहे.
७	गुन्हा रजिस्टर नं. /कलम/ पो.स्टे. जिल्हा, दि.व वेळ	पोलीस स्टेशन महागाव , जिल्हा यवतमाळ, येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
८	आरोपी अटक दिनांक व वेळ	तिन्ही आरोपी लोकसेवकास ताब्यात घेतले असुन गुन्हा दाखल होताच अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची कारवाई सुरू आहे.
९	सापळा अधिकारी	स्वप्निल निराळे, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि, यवतमाळ मो. क्र. ९५९५३०९०९८
१०	पर्यवेक्षण अधिकारी	अभय आष्टेकर, पोलीस उप अधिक्षक ला प्र वि, यवतमाळ मो.क्र.८२७५०८७७९७
११	सापळा पथक	पो.नि.स्वप्निल निराळे, पो.नि.मनोज ओरके, पो.हवा. अतुल मते, जयंत ब्राह्मणकर, सुधीर कांबळे पो.शि. आकाश सहारे, भागवत पाटील, म.पो.शि.सरिता राठोड चापोकॉ दिनेश सरोदे
१२	मार्गदर्शन	१)बापू बांगर, पोलीस अधीक्षक ला. प्र. वि. अमरावती परिक्षेत्र. मो. न.९०११३२३४२६. २) सुनिल किनगे अपर पोलीस अधीक्षक ला. प्र. वि. अमरावती परिक्षेत्र मो. न ९८२३११११५५

१३ लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

	घटक कार्यालय	परिक्षेत्र कार्यालय	लाप्रवि. मुख्यालय
	१	२	३
पत्ता	कार्यालय पोलीस उप अधिक्षक ला.प्र. वि. यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक,यवतमाळ	अँटी करप्शन ब्युरो अमरावती, ललित सेंटर, परांजपे कॉलनी,अमरावती.	सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई–४०००३०
दुरध्वनी क्रमांक, व्हॉट्सअप क्रमांक १०६४	०७२३२–२४४००२ ८९७५७९१०६४	०७२१–२५५३०५५	०२२–२४९२१२१२
ई–मेल आयडी	dyspacbyavatmal@mahapolice.gov.in	spacbamrawati@mahapolice.gov.in	acbwebmail@mahapolice.gov.in

(अभय आष्टेकर)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ